# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'B++' grade

आज़ादी का अमृत महोत्सव

Phone : (02462) 215525 **DEPARTMENT OF STUDENTS DEVELOPMENT** Website: srtmun.ac.in

Fax : (02462) 215572 E-mail: dir.dsd@srtmun.ac.in


जा.क्र./ वि.वि.वि./ २०२३-२४/ ३५५ दिनांकः - ०२/०३/२०२४

प्रति,

मा. प्राचार्य,

सर्व संलग्नित महाविद्यालये, नांदेड

जिल्हा नांदेड.

विषयः- आगामी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयातील १८ व १९ वयोगटातील विद्यार्थ्यांची मतदार म्हणून नोंदणी करून घेणे बाबत.

महोदय,

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आगामी २०२४ निवडणूकीच्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोग व जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय, यांचे माध्यमातून अनेक उपक्रम घेतले जात आहेत. या उपक्रमामध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, सक्रियपणे सहभागी होत असते. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्याकडून प्राप्त विनंती अन्वये आपल्या जिल्ह्यातील वय वर्ष १८ पूर्ण केलेले नव मतदारांची नोंदणी करण्यासाठी विशेष मोहिम जिल्हा प्रशासना मार्फत राबवण्यात येत आहे.

या मोहिमेतंर्गत सर्व महाविद्यालयांमध्ये जिल्हा निवडणूक कार्यालयातर्फे बूथ लेवल ऑफिसर अर्थात मतदान केंद्रस्तरीय अधिकारी हे स्वतः हजर राहतील. आपल्या महाविद्यालयातील अद्याप पर्यंत मतदार यादीत नोंदणी न केलेल्या विद्यार्थ्यांची यादी करून त्यांचे आवश्यक ते कागदपत्रे घेऊन सदरच्या उपक्रमांमध्ये त्या सर्वांचे मतदान नोंदणी करण्याविषयी आपल्या स्तरावरून कार्यवाही करणे आवश्यक आहे.

तरी त्या अनुषंगाने मतदार केंद्रस्तरीय अधिकारी आपल्याशी संपर्क साधतील, त्यावेळी त्यांच्यासोबत योग्य नियोजन करून आपल्या महाविद्यालयातील १००% विद्यार्थ्यांचे मतदार म्हणून नोंदणी होईल, याबाबत आपण कार्यवाही करावी, याविषयी कुठलीही अडचण आल्यास स्थानिक तहसीलदार कार्यालय किंवा उपविभागीय अधिकारी कार्यालय यांच्याशी संपर्क साधावा. तरी यासंदर्भात आपल्या स्तरावरून कार्यवाही करावी, ही विनंती.

डॉ. सूर्यप्रकाश जाधव

संचालक,

विद्यार्थी विकास विभाग.

प्रत महितीस्तव:

श्री. अजय दर्शनकार, सिस्टिम एक्सपर्ट (संगणक विभाग) यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक संकेतस्थळावर ठेवण्यात यावे.